# बार्टीतर्फे वारीत संविधान दिंडीची उत्साही सुरुवात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था, यांच्या वतीने संविधान दिंडी या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाची सुरूवात गुरुवारी (दि.१९) आळंदी येथे करण्यात आली.

संविधानाचा अमृत महोत्सव याचे औचित्य साधून आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी ते पंढरपूर या १९ दिवसांच्या प्रवासादरम्यान, संविधानाचे मूल्य, अधिकार आणि प्रस्ताविकेचे महत्त्व वारकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. संविधान दिंडीमध्ये सहभागी समताधूतांच्या माध्यमातून पथनाट्य, प्रश्नमंजूषा, प्रस्ताविकेचे वाटप आणि संविधान जागृतीचे विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमाचे मार्गदर्शन सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाठ, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे. ही संविधान दिंडी पुणे, सातारा व सोलापूर या जिल्ह्यातून जात असून प्रचंड मोठ्या प्रमाणात सहभागी होणारे विठ्ठल भक्त यांना संविधानाचे महत्त्व विशद करण्यासाठी संविधान दिंडीचे उद्घाटन चारोली फाट्या येथे स्नेहल भोसले, वृषाली शिंदे अनिल कारंडे तसेच श्रीमती नसरीन तांबोळी (प्रकल्प व्यवस्थापक), महेश गवई,सुमेध थोरात, शितल बंडगर प्रकल्प अधिकारी व बार्टी मुख्यालयातील इतर कर्मचारी व समता दूत उद्घाटनाला उपस्थित होते. या सर्वांच्या मदतीने संविधान दिंडीतून नागरिकांपर्यंत संविधानाचे महत्त्व पोहोचवण्याचा मानस आहे. तसेच उद्घाटनप्रसंगी संविधान उद्देशिकेचे वाचन करून सर्वांना मोफत उद्देशिकेचे वाटप करण्यात आले.

संविधानाच्या शिक्षणाची गंगा भक्तिरसामध्ये मिसळून लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठीचा हा उपक्रम समाजजागृतीस चालना देणारा आहे. तसेच बार्टी संस्थेच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कामकाज देखील समता समतादूत यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner